Vol-13 Special Issue- 1.2 ISSN- 2349-7076

EduInspire-An International E-Journal
An International Peer Reviewed and Referred Journal (www.ctegujarat.org)
Council for Teacher Education Foundation (CTEF, Gujarat Chapter)
Patron: Prof. R. G. Kothari
Chief Editor: Prof. Jignesh B. Patel
Email:- Mo. 9429429550 ctefeduinspire@gmail.com

# वसुदेव कुटुंबकम् ही संकल्पना आजच्या काळाची गरज एक अभ्यास

**डॉ.मालती सावरकर**
सहाय्यक प्राध्यापक
शांतिनिकेतन वुमन्स कॉलेज ऑफ एजुकेशन (बी.एड) उप्पलवाडी, कामठी रोड, नागपूर

## प्रस्तावना (Introduction)

वसुधैव कुटुंबकम् ही संकल्पना फार जुनी असून ती भारतीय संस्कृतीतील एक महत्त्वाची विचारधारा आहे. याचा अर्थ संपूर्ण पृथ्वी हे एक कुटुंब आहे.आजच्या काळात जागतिकीकरणामुळे संपूर्ण जग एकमेकांशी जोडले गेले आहे. व्यापार, शिक्षण, तंत्रज्ञान आणि दळणवळणामुळे देशांमधील अंतर कमी झाले आहे. आज जग अनेक समस्यांना सामोरे जात आहे जसे की युद्ध, दहशतवाद, सामाजिक विषमता, पर्यावरण प्रदूषण इत्यादी. या समस्यांचे निराकरण एकट्या देशाला शक्य नाही, तर सर्व देशांनी एकत्र येऊन प्रयत्न करणे आवश्यक आहे. वसुधैव कुटुंबकम् ही संकल्पना मानवतेचा संदेश देते. ती आपल्याला एकमेकांशी प्रेम, सहकार्य व सहानुभूतीने वागण्याची शिकवण देते. म्हणूनच ही संकल्पना आजच्या काळात अत्यंत महत्त्वाची व गरजेची आहे. एकीकडे विज्ञान-तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे जग अतिशय जवळ आले आहे, तर दुसऱ्या बाजूला सामाजिक द्वेष, धार्मिक संघर्ष, युद्ध, पर्यावरणीय हानी आणि नैतिक मूल्यानमुळे मानवी जगणे कठीण होत आहे. या सध्याच्या परिवेशात वसुधैव कुटुंबकम् संकल्पना केवळ नैतिक तत्त्व नव्हे, तर अत्यंत आवश्यक आदर्श बनली आहे. या संशोधनाचा उद्देश वसुधैव कुटुंबकम् या तत्त्वज्ञानाचा अभ्यास करणे व त्याचे आधुनिक जगातचे उपयोग स्पष्ट करणे आहे.

## तात्त्विक पार्श्वभूमी (Theoretical Background)

वसुदेव कुटुंबकम ही संकल्पना उपनिषद सारख्या प्राचीन हिंदु ग्रंथांमधून आलेला आहे. अयं निजः परो वेति गणना लघुचेतसाम्| उदारचरितानां तु वसुधैव कुटुंबकम् || याचा अर्थ असा की, स्वतः व परका यांचा भेद करण्याची भावना कमी विचारांनी होते; तर उच्च विचारशील लोकांसाठी संपूर्ण पृथ्वी हे एकच कुटुंब आहे. सर्व सामान्य पणे उदार मनाचे लोक संपूर्ण जगाला एक कुटुंब मानतात.

## संशोधनाची आवश्यकता (Need for the Study)

### आजची काळ:

धर्मांमध्ये संघर्ष
जातीय व सामाजिक अन्याय
पर्यावरणीय संकटे
लोकशाही संकटे
आर्थिक असमानता

हे सर्व मानवी जगात वाळवंटासाठी धोकादायक आहेत. त्यामुळे नविन मूल्यांनी मुक्त, परस्पर आदर, समता आणि शांततेवर आधारित सामाजिक व्यवस्था आवश्यक आहे. वसुधैव कुटुंबकम् ही संकल्पना या गरजेची पूर्तता करू शकते.

## आज शिक्षणात वसुदेव कुटुंबकम ही संकल्पना रुजविणे का गरजेचे आहे

EduInspire-An International E-Journal
An International Peer Reviewed and Referred Journal (www.ctegujarat.org)
Council for Teacher Education Foundation (CTEF, Gujarat Chapter) Email:- ctefeduinspire@gmail.com

आज विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धेचे प्रमाण वाढले आहे. जो तो आपण इतरांपेक्षा कश्या रीतीने पुढे जावु शकतो याच्या मागे लागला आहे. एकमेकांविषयी कुठलीही सहानुभूती राहीली नाही. हि स्पर्धा फक्त विद्यार्थ्यांमध्ये नसुन ती शिक्षक व समाजातील प्रत्येक व्यक्तीमध्ये आहे. त्यामुळे एकात्मतेची भावना रुजविणे गरजेचे आहे. याची सुरवात ही शिक्षणाच्या माध्यमाने शाळेमधून देण्याची आवश्यकता आहे. कारण आजचा विद्यार्थी उद्याचा भावि नागरिक आहे. वसुदेव कुटुंबकम ही संकल्पना विद्यार्थ्यांना शिकविल्यास त्यांच्यात सहकार्याची भावना निर्माण होईल. एकमेकांविषयी आदर वाटेल. तसेच सामाजिक जबाबदारीची जाणीव होईल.

### संशोधन प्रश्न (Research Questions)

वसुधैव कुटुंबकम् ही संकल्पना कोणत्या तात्त्विक आधारावर उभी आहे? आजच्या सामाजिक आणि जागतिक समस्यांसाठी ही संकल्पना कशी उपयुक्त आहे? या संकल्पनेचा समाजात सकारात्मक बदल घडविण्यासाठी कोणते उपाय करता येऊ शकतात?

### पद्धती (Methodology)

हा संशोधन पेपर दुसऱ्या स्रोतांचा (Secondary Sources) अभ्यास, लेख, पुस्तके, शास्त्रीय ग्रंथ आणि जागतिक घटना/उदाहरणे यांचा तुलनात्मक अभ्यास करून तयार केला आहे.

### निष्कर्षपूर्वीचा अभ्यास (Review of Literature)

आधुनिक आचारविचारातील शांती, समता आणि मानवी अधिकारांचा अभ्यास करणाऱ्या अनेक लेखकांनी "वसुधैव कुटुंबकम्" या तत्त्वज्ञानाचा उल्लेख केला आहे. हे तत्त्व धर्मापलीकडे जाऊन सर्व मानवतेचा आदर वाढवण्यास मदत करते.

### तात्त्विक व सामाजिक महत्त्व (Significance)

आधुनिक सामाजिक समस्यांवर परिणाम

धार्मिक संघर्ष कमी होणे: सर्व धर्मांना समान आदर देण्याची शिकवण

लिंग, जात, वर्ग यांचे भेद मिटणे

मानवी हक्कांचे संरक्षण

आंतरराष्ट्रीय शांतीसाठी

देशांमधील संघर्ष कमी करणे

जागतिक सहकार्य व विकासासाठी आदर्श वातावरण

पर्यावरणीय शाश्वतता

पृथ्वी हे एकच घर आहे हे मान्य केल्याने पर्यावरण रक्षणासाठी सामाजिक जबाबदारी वाढते.

### अभ्यासाचे परिणाम (Findings)

| वसुधैव कुटुंबकम् चे परिणाम | संदर्भ क्षेत्र |
|---|---|
| द्वेष कमी, सहकार्य वाढले | सामाजिक बंधुत्व |
| सामुदायिक मूल्यांचा समावेश | शिक्षण क्षेत्र |
| शांतता व संवादाला प्राधान्य | राजकारण |
| विविधता व समावेश सुधारणे | रोजगार |

### "वसुधैव कुटुंबकम्" ही संकल्पना प्रत्यक्ष जीवनात राबविण्यासाठी पुढील उपाय योजता येतील:

शिक्षणात समावेश – नीतिमूल्य आणि जागतिक नागरिकत्व

CTEF Council for Teacher Education Foundation ESTD. 1985

EduInspire-An International E-Journal
An International Peer Reviewed and Referred Journal (www.ctegujarat.org)
Council for Teacher Education Foundation (CTEF, Gujarat Chapter) Email:- ctefeduinspire@gmail.com

जागतिक कार्यक्रमांची रचना – सांस्कृतिक आदानप्रदान

मीडिया आणि डिजिटल प्लॅटफॉर्मचा वापर – सकारात्मक सामाजिक संदेश प्रसारित करणे

## निष्कर्ष (Conclusion)

आजच्या काळात "वसुधैव कुटुंबकम्" ही केवळ एक तात्त्विक संकल्पना नाही तर मानवतेचा आधार आहे. सामाजिक दृष्टीने समता, आदर आणि शांती निर्माण करण्यासाठी हे मूल्य आवश्यक बनले आहे. मानवी सहअस्तित्व, पर्यावरणीय जबाबदारी आणि जागतिक विकास या सर्वांसाठी या तत्त्वज्ञानाचा उपयोग केला जाऊ शकतो.

या संकल्पनेचा अवलंब केल्यास समाजात सकारात्मक बदल संभवतात जे समृद्ध, शांत आणि प्रगत जगासाठी अत्यंत आवश्यक आहे.

## संदर्भ (Reference List)

महावाक्य उपनिषद

Radhakrishnan, S. Indian Philosophy

NCERT – Value Education and Human Rights

UNESCO Reports on Global Citizenship Education माजसेवा व स्वयंसेवी कार्य – मनुष्यसेवा व पर्यावरण कार्य

Teacher's Welfare is Nation's Welfare
CTEF
Council for Teacher Education Foundation
ESTD. 1985